# वारीदरम्यान मृत्यू झाल्यास वारकऱ्याला ४ लाखांची मदत

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

यंदा महाराष्ट्र सरकारने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. वारीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अपघातात वारकऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून चार लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे .यासंदर्भातलं नवं परिपत्रक महसूल विभागाने जाहीर केला आहे .

या निर्णयामुळे वारीदरम्यान घडणाऱ्या अनपेक्षित घटनांमध्ये वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणार आहे. १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत वारीदरम्यान जर एखाद्या वारकऱ्याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणामुळे मृत्यू झाला, तर



त्यांच्या कुटुंबीयांना ही रक्कम मिळणार आहे. मात्र आत्महत्येच्या घटनांमध्ये ही मदत लागू होणार नाही. याशिवाय, वारीदरम्यान अपघातामुळे अपंगत्व आल्यास देखील आर्थिक मदतीची तरतूद आहे.

अपघाताने व दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या निकटच्या वारसदारांस ४ लाखांची मदत, वारीदरम्यान अपंगत्व आलेल्या वारकऱ्यांना ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास ७४,०००, ६० टक्क्यांवरून अधिक अपंगत्व आल्यास २.५० लाख, एका आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी इस्पीतळात दाखल झाल्यास १६००० रुपये तर एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी दाखल असल्यास ५४०० रुपयांची मदत केली जाणार आहे. १६ जून ते १० जुलैदरम्यान, अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू झालेल्या तसेच जखमी झालेल्या वारकऱ्यांसाठी मदतीची तरतूद करण्यात आली आहे.

# माऊलींच्या पालखीत चोपदाराने महिलेस दिले ढकलून; वारीतील शिस्त, स्नेहभाव, प्रेमबंध, सेवाभावाला गालबोट

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

- चोपदाराची महिला वारकऱ्यासोबत वादावादी
- धक्कादायक अन् संताप आणणारा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल

**वारीतील शिस्त, स्नेहभाव, प्रेमबंध, सेवाभावाला याला गालबोट लागण्याचा प्रकार घडला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात एका महिला वारकऱ्यासोबत चोपदाराने उद्धटपणे वर्तन केले आहे. या महिलेस जोरात ढकलून तर दिलेच पण तिच्यासोबत वाद घातल्याची घटना समोर आली आहे. यासंबंधीचा संतापजनक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**



सोलापूर : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात चोपदाराकडून महिला वारकऱ्यास ढकलून तिच्या सोबत वादावादी करण्याचा सोशल मिडियावर व्हायरल होत असलेला व्हिडिओ.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील हा धक्कादायक व्हिडिओ सध्या सोशल माध्यमात व्हायरल होऊ लागला असून यामध्ये चोपदार एका महिलेला ढकलून देताना आणि पुन्हा वाद करताना दिसत आहे. संत ज्ञानेश्वरांची पालखी आज ३ जुलै सकाळी वेळापूरहून प्रस्थान झाल्यावर उघडेवाडी येथे माऊलींचे ऊभे रिंगण पार पडले. हे रिंगण झाल्यानंतर काही स्त्रिया डोक्यावर तुळस घेऊन प्रदक्षिणा घालत होत्या. दरम्यान, अचानक या दिंडीतले मुख्य चोपदार पुढे आले आणि तुळस डोक्यावर घेतलेल्या एका महिला वारकऱ्यास जोरात ढकलून दिले. त्यामुळे, ती महिला वारकरी गोल रिंगण करुन समोर बसलेल्या वारकरी माऊींच्या आंगावर पडली. विशेष म्हणजे या महिला वारकरी भक्ताच्या डोक्यावरील तुळस पितळाची होती, दुर्दैवाने ती तुळस इतर कोणाला किंवा त्याच महिलेला लागली असती तर मोठा अनर्थ झाला असता. एवढं होऊनही हे चोपदार महाशय थांबले नाहीत, जोरजोराने ओरडत या महिलेशी ते वाद घालत होते.

### नेटीझन्सकडून चोपदाराच्या उद्धटपणावर जोरदार 'प्रहार'

दरम्यान, संत ज्ञानेश्वरांना माऊली म्हणजेच आई म्हणतात, आणि याच माऊलीच्या पालखीत एका महिला वारकऱ्यास अशा पद्धतीची वागणूक येणे दुःखद आहे. त्यामुळेच, नेटीझन्सकडून या चोपदाराच्या उद्धटपणावर जोरदार प्रहार केला जात आहे. वारी म्हणजे शिस्त, शांती आणि प्रेमाची शिकवण देणारा वैष्णवांचा उत्सव. मात्र, माऊलींच्या पालखीतील हे चोपदार महाशय ही शिकवण विसरले काय? असा सवालही यानिमित्ताने उपस्थित होत आहे.



वडाळा: रक्तदान शिबिराप्रसंगी रत्नदीप साठे, बळीराम साठे, जयदीप साठे, प्राचार्य डॉ.शिरीष भोसले व इतर.

# सरपंच जितेंद्र साठे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

✔ उत्तर सोलापूर/प्रतिनिधी

वडाळा गावचे सरपंच व श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र साठे, जयदीप साठे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात २१० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

९ यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे, प्राचार्य डॉ. शिरीष भोसले, प्रा.बाळासाहेब वाघचौरे, प्रा.विकास शिंदे, प्रा.प्रमोद पाटील, प्रा.बालाजी गंगावणे, प्रा.विजय म्हमाणे, गावडी दारफळचे सरपंच भारत माळी, नागेश पवार, भाऊ लामकाने, दीपक अंधारे, वडाळा ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर गायकवाड,मनोज साठे, संपत गाडे, रमेश गाडे, दत्तात्रय वीर, संतोष सुभेदार, तात्या सुपाते आदी उपस्थित होते. रत्नदीप रविंद्र साठे हा शिक्षणासाठी जर्मनीमध्ये आहे.तो जितेंद्र साठे यांच्या चुलत भावाचा मुलगा असून तो वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान करण्यासाठी आवर्जून आला होता.

# वाळू वाहतुकीला आता २४ तास राहणार 'ग्रीन' सिंग्रल

## सरकारचा निर्णय, अवैध वाहतुकीला लागणार 'ब्रेक'

✔ नागपूर/प्रतिनिधी

राज्यात वाळू वाहतुकीसंदर्भातील दीर्घकाळ प्रलंबित असलेला निर्णय अखेर घेण्यात आला असून, सकाळी ६ ते सायंकाळी ६ या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूची वाहतूक आता २४ तास करता येणार आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली.

सद्यस्थितीत सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच वाळूचे उत्खनन परवानगीने होते. पण दिवसभरात साठवलेली वाळू रात्री उचलता



(संग्रहित छायाचित्र)

न आल्यामुळे वाहतूक क्षमतेचा योग्य उपयोग होत नाही आणि त्यामुळे अवैध वाहतूक वाढते. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाखनीज पोर्टलवरून २४ तास ईटीपी तयार करता येईल अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली

### वाहतुकीसाठी सुरक्षिततेचे पाऊल

वाहतुकीच्या पारदर्शकतेसाठी शासनाने विविध उपाययोजना केल्या असून, प्रत्येक वाळूघाटाचे जिओ-फेन्सिंग केले जाणार आहे. घाट व मार्गांवर सीसीटीव्ही बसवले जाणार वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना डिव्हाइस अनिवार्य करण्यात येणार, असे बावनकुळे म्हणाले.

# कृषी दिन उत्साहात साजरा

✔ सोलापूर : कृषी विभाग महाराष्ट्र शासन, आत्मा सोलापूर व जिल्हा परिषद सोलापूर कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमा कै. वसंतराव नाईक जयंती निमित्त कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात सकाळी पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले, प्रकल्प संचालक, आत्मा कांतप्पा खोत, कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे उपस्थित होते. विशेष व्याख्याते म्हणून तुर लागवडीची पंचसूत्री आणि खरीप नियोजन अमोल शास्त्री व सोयाबीन लागवड तंत्रज्ञान डॉ. लालासाहेब तांबडे यांनी शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानावर मार्गदर्शन केले. यावेळी शेतीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. प्रशस्तीपत्र व रोपवाटिकेतील रोपे देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे, जिल्हा परिषदेअंतर्गत जि.प. सेस योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना आणि बायोगॅस योजनेअंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

# 'चंद्रभागे'त वारकऱ्यांना करता येणार स्नान

## उजनी धरणातून भीमा नदीमधील विसर्ग केला कमी

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरीच्या पांडुरंगाचा आषाढी वारीचा सोहळा ६ जुलैला पंढरपुरात रंगणार आहे. त्यासाठी राज्यभरातून १३ ते १५ लाख भाविक पंढरपूरमध्ये असणार आहेत. या पार्श्वभूमीवर चंद्रभागेत वारकऱ्यांना स्नान करता यावे, वाळवंट परिसरात पाण्याचा विसर्ग जास्त राहू नये, यासाठी आता उजनी धरणातून भीमा नदीत सोडलेले पाणी पूर्णत: बंद करण्यात आले आहे.त्यामुळे उद्या (शुक्रवारी) सकाळपर्यंत चंद्रभागेच्या वाळवंट परिसरातील विसर्ग कमी होणार आहे. चंद्रभागेचे वाळवंट काही प्रमाणात रिकामे होणार असून वारकऱ्यांना पवित्र स्नान करता येणार आहे.



(संग्रहित छायाचित्र)


| धरणातून सोडलेल्या पाण्याचा तपशील | |
|---|---|
| सीना-माढा उपसा सिंचन योजना | ८० क्युसेक |
| दहिगाव उपसा सिंचन योजना | ८० क्युसेक |
| बोगदा | ९०० क्युसेक |
| कालव्यातून सोडलेले पाणी | १५०० क्युसेक |

उजनी धरण सध्या ७३ टक्क्यांपर्यत भरले असून धरणावरील विद्युतनिर्मिती प्रकल्पासाठी सोडण्यात येणारे १६०० क्युसेक पाणी देखील बंद करण्यात आले आहे. ८ जुलैपर्यंत उजनीतून भीमा नदीत पाणी सोडले जाणार नाही, जेणेकरून आषाढी वारीचा सोहळा व्यवस्थित पार पडेल हा हेतू आहे. उजनी धरणात सध्या दौंड व स्थानिक परिसरातून १२ हजारांहून अधिक क्युसेकची आवक जमा होत आहे. पण, धरणातून भीमा नदीत सोडण्यात येणारा विसर्ग बंद केल्याने पुढील पाच दिवसांत धरण ९५ टक्क्यांपर्यंत भरेल, अशी स्थिती आहे. धरणात सध्या एकूण १०३ टीएमसी पाणी असून त्यात ३९ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. दरम्यान, वीर धरणातून सोडण्यात येणारा विसर्ग देखील आता बंद करण्यात आला आहे.

# पिस्तुलचा धाक दाखवून तरुणाच्या खिशातील रोकड लुटली

## टेंभुर्णी येथील घटना; दोघांवर गुन्हा

✔ टेंभूर्णी/प्रतिनिधी



दुचाकीवरून जाणाऱ्या तरुणास वाटेत अडवून लोखंडी रॉड आणि टॉमीने मारहाण करून जखमी करण्यात आले. त्यानंतर पिस्तुलने ठार मारण्याची धमकी देत तरुणाच्या खिशातील ६ हजार ५०० रुपये लुटून नेले.ही जबरी चोरीची घटना टेंभुर्णी (ता .माढा) येथील पेट्रोल पंपाजवळ २९ जून रोजी दुपारच्या सुमारात घडली. टेंभुर्णीच्या पोलिसांनी दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

शीतल अनिल बनसोडे (वय ३१ रा. अकोले खुर्द ता.माढा) असे जखमीचे नाव आहे. बुद्धभूषण भीमराव वजाळे आणि वरुण रजपूत (दोघे रा. अकोले खुर्द ता.माढा) या दोघांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. शीतल बनसोने हे त्यांचा आतेभाऊ आशिष गायकवाड याच्यासोबत गॅसटाकी घेऊन घराकडे निघाले होते. करमाळारोड येथे असलेल्या पेट्रोल पंपाजवळ आरोपींनी त्यांची दुचाकी अडवत शीतल यास मारहाण करीत त्यांना पिस्तुलचा धाक दाखवून खिशातील पैसे लुटून नेले. तपास फौजदार धापटे करीत आहेत.

# महिलेचे सोन्याचे दागिने पळवले

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर ते सातारा जाणाऱ्या एसटी बस ने पेनूरला जाण्याऱ्या रेश्मा राजमहंमद मुजावर (वय-४५,रा.मुक्काम पोस्ट पेनुर)यांच्या पर्समधील २ लाख १० हजारांचे दागिने चोरट्यांनी पळवले.

ही घटना सावळेश्वर टोल नाकाजवळ घडली. याप्रकरणी रेश्मा मुजावर यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली अरहे. स.पो.नि. क्षीरसागर तपास करीत आहेत.

# दोघा प्राध्यापक भावांनी मनाचा दाखवला दिलदारपणा; शेतकरी भावाला दिला शेताच्या वाटणीत मोठा हिस्सा

✔ परभणी/प्रतिनिधी

- जन्मदात्या माता-पित्याचे पांग फेडले
- रक्ताच्या नात्याचे मोलही जपले
- आई-वडिलांच्यासमोर कुठलाही वादविवाद न करता वाटणी

आज भाऊ बंदकीमध्ये शेतवाटणीत एक एक इंचावरून भाऊ भावाचा जीव घेण्याचे, कोर्ट कचेऱ्या करून आयुष्यभर एकमेकांचे तोंडही बघितले जात नसल्याचे अनेक उदाहरणे दिसतात. मात्र यातच काही बोटावर मोजण्या इतके अशीही कुटुंब आहेत की, जे जमिनीपेक्षा नात्याला मानतात. परभणीच्या गंगाखेड तालुक्यातील दहिफळे बंधूंनी शेतवाटणीत असाच एक आदर्श घालून दिलाय, ज्याची चर्चा राज्यभर होतेय. शेतकरी भावाला दिला मोठा हिस्सा दिला आहे.

विशेषत्वे, दहिफळे बंधुंनी दाखवलेला वाटणीतील हा सामंजस्य आणि मनाचा मोठेपणा हा वाटणीमुळे कित्येक वर्षांपासून न्यायालयात भांडत असलेल्या भावांसाठी एक नवीन मार्ग मोकळा करणारा तर आहेच, शिवाय नवीन पिढीसमोरही एक आदर्श निर्माण करणारा म्हणावा लागेल.



परभणी : गंगाखेड तालुक्यातील हेच ते दहिफळे बंधू आणि त्यांचे वडिल. ज्यांनी वादावादी न करता मोठ्या शेतकरी भावास जमिनीचा मोठा हिस्सा दिला. दुसऱ्या छायाचित्रात त्यांची शेतजमीन.

### शेतकरी भावाला जमिन दिली ती सगळी बागायत

साडेसोळा एकर मधील जी ९.५ एकर जमीन मधला भाऊ केशव दहिफळे यांच्या वाटणीला आलीय. ती जमीन पूर्णतः पाण्याखाली असून २ विहीर बोअर शेतात आहे. शिवाय साडे नऊ एकरमधली आंबराईही त्यांच्या हक्कात आलीय. तसेच मुलगा आणि मुलीचे शिक्षण आणि लग्नही नोकरदार भाऊच करणार असल्याने केशव आणि त्यांच्या पत्नीचा आनंद गगनात मावेनासा झालाय..

परभणीच्या गंगाखेड तालुक्यातील खादगाव येथील रंगनाथराव दहिफळे यांचे कुटुंब आहे. त्यांना ३ मुले आणि १ मुलगी, नातवंड असा मोठा परिवार आहे. मोठा मुलगा प्रा. डॉ. बाळासाहेब आणि लहान मुलगा प्रा. युवराज हे दोघेही प्राध्यापक आहेत. मधला मुलगा केशव शेती करतात. वडिलांची एकूण १६.५ एकर जमीन, गावात घर, जागा असा प्रपंच आहे. ९१ व्या वर्षी वडिलांनी माझ्या डोळ्यासमोर तुमच्या वाटण्या व्हाव्यात अशी इच्छा व्यक्त केली. त्यावर तिन्ही भाऊ, त्यांच्या पत्नी, बहीण अशा सर्वांनी घरच्या घरी बसून वाटण्या केल्या.यामध्ये दोन्ही प्राध्यापक भावांनी, स्वतः नोकरीत असल्याने, शेती करणाऱ्या भावाला १६.५ एकर जमिनीपैकी ९.५ एकर जमीन दिली. स्वतःकडे ३-३ एकर जमीन ठेवली.

एवढंच नव्हे, तर शेती करणाऱ्या भावाच्या मुलांचे शिक्षण आणि लग्नाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. कुठलाही वादविवाद न करता, अतिशय आनंदात हे सर्व घडले, तेही त्यांच्या आई-वडिलांसमोर.

### तिन्ही जावांचा हसत हसत पाठिंबा; नात्यामधील जपला गोडवा

सध्याच्या वातावरणात एकत्रित कुटुंब पद्धती ही खुप कमी राहिली आहे. त्यात दहिफळे कुटुंबाने एकत्रित कुटुंब पद्धती तर जपलीच, शिवाय नात्यातील गोडवाही कायम ठेवलाय. एवढा मोठा निर्णय घेताना घरातील महिलांचे विचार जुळणे हे अत्यंत महत्वाचे असते. दहिफळे कुटुंबियातील महिलांनीही या निर्णयाला हसत हसत पाठींबा दिला. आमच्या कुटुंबात आम्ही बहिणीसारखे राहतो आणि जे काही निर्णय घ्यायचे ते सर्व जण मिळून घेतो असे तिन्ही जावा सांगतात..

### गावकऱ्यांनीही केलं अनोख्या वाटणीचं स्वागत

दरम्यान गंगाखेडच्या डोंगररांगांमध्ये वसलेल्या अडीच हजार लोकवस्तीच्या खादगावात विनावाद विना भांडणे केवळ वडिलांनी सांगणे आणि भावांनी ऐकून संपत्तीची वाटणी केली .केवळ वाटणीच नाही तर जो भाऊ आर्थिक कमजोर आहे, त्याला ही यातून उभे केले. ही आमच्या गावासाठीची अभिमानाची बाब असून दहिफळे कुटुंबियांनी दाखवलेल्या मार्गानेच आम्ही चालण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही गावकर्यांनी दिलीय.